सकाळ | पुणे
TODAY
पुणे, रविवार, १३ जाने
f SakalNews | @esakalupdate | www.esakal.com | Call Centre : 9

झाडू व खराटे बनविणे, ...ेती, बागकाम आदी

मजुरी मिळते.

पान ३ वर »

...त्याही ...ालियातील ...तुष्ट अधिकारी- ...ाचोरी ...्द्वारे वैयक्तिक ...सानीबरोबरच ... कंपन्यांचीही ...ते. ऑनलाइन ...करी, गृहकर्ज ...ाण्याने होणारी ...ेपरफुटी अशी उदाहरणे आहेत.

...यगुडे, पोलिस ...र पोलिस ठाणे.

...ेटच्या ...वेळी ...्या वैयक्तिक ...त्यक्ष- ...ा चोरी होत ...ध्ये केवळ ...वणूक करून प्रतिमा मलीन ... त्यामुळे ...नी स्वतः ...री घेणे गरजेचे

...ॅड. राजस ...ाळे, ...बर तज्ज्ञ

## 'विश्वकर्मा'ने घेतली पाच गावे दत्तक

**पुणे, ता. १२ :** केंद्र सरकारच्या उन्नत भारत अभियानासाठी विश्वकर्मा खासगी विद्यापीठाची निवड झाली आहे. या अभियानांतर्गत विद्यापीठाने सिंहगड परिसरातील सामरेवाडी, थोपटेवाडी (एक आणि दोन), भादलवाडी आणि मोरदरी ही गावे दत्तक घेतली आहेत.

तंत्र शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या साह्याने ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले आहे. यासाठी देशभरातील काही शिक्षण संस्थांची निवड करण्यात आली असून, त्यात विश्वकर्मा विद्यापीठाचा समावेश आहे. या अभियानांतर्गत विद्यापीठाच्या अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांनी या गावांची पाहणी करून तेथील प्रश्न जाणून घेतले आहेत.

"या गावांमध्ये पिण्यासाठी शुद्ध पाण्याच्या तुटवडा असून; उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध नाही. तसेच, आरोग्य सेवांची वानवा असल्याचे पाहणीतून समोर आले. गावांमधील एकेका प्रश्नावर टप्प्याटप्प्याने काम करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात पिण्याचे शुद्ध पाणी पुरविण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार असल्याचे समन्वयक कैलास भोसले यांनी सांगितले.